Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

11.

# गुलमोहर.....लाली मेरे लाल की!

प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे
प्रमुख,
मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र.
विवेकानंद महाविद्यालय,छ.संभाजीनगर

शिशिराची पानगळती सरते आणि भूतलावर नवचैतन्य घेऊन येतो तो ऋतूराज वसंत.श्रीकृष्णाने गीतेत आपल्या विभूती सांगितल्या आहेत,त्यात तो म्हणतो," किरणांमध्ये मी सूर्य आहे.नक्षत्रांमध्ये चंद्र मी आहे.ऋतूंमध्ये मी वसंत ऋतू आहे."वसंतऋतूंत झाडांना फुलांचा बहर येतो.वास्तविक वसंतात सूर्य इतका तापतो की,अंगाची लाही लाही होते.पण या तप्ततेची थोडीही फिकीर न करता,झाडं याच ऋतूत बहरतात.विशेषतः चाफा,पळस,गुलमोहर किंवा जंगलातील विशिष्ट अशा काही वनस्पती असतात की,ज्या जितका सूर्य आग ओकेल तितक्या जास्त बहरतात.निसर्ग आणि मानवी मन यात यात अंतर नाही.म्हणून तर तुकोबा त्या वृक्षवल्लींना आपले 'सोयरे' मानतात.जितका अधिक तीव्र संघर्ष तितकं काही माणसांचं अधिक बहरणं असतं.हे बहरणं इतकं बेमालूम असतं की,स्वतः उन्हाच्या झळा सोसून दुसऱ्यांना आनंदाचा गारवा देतात.म्हणून तर खान्देशातील कवयित्री 'भीमा' नदीचं वर्णन करताना म्हणते,

"माझी भीमाई माऊली।जशी आंब्याची साऊली।

आम्हाईले केले गार।सोता उन्हात तावली॥"

कुटुंबाच्या सुखासाठी काही माणसं या आम्रवृक्षासारखी त्यागी बनतात.झाड बहरतं,पावसाळ्यात हिरवंगार होतं.पण त्यासाठी मुळांनी स्वतः मातीत गाडून घेतलेलं असतं.त्यांना एवढंच माहित असतं की,आपण अहोरात्र खपलं तरंच हा वृक्ष टिकेल.तसं कुटुंबाच्या हितासाठी स्वतःला मातीत गाडून घेणारी अनेक पालकरुपी मुळं असतात,आपल्याला भरभराट ,ऐश्वर्य दिसते,पण त्यासाठी स्वतः संसाराच्या मातीत गाडून घेतलेली माणसं दिसत नाही.त्यांना माहित असतं की,"आधी हाताला चटके,तेव्हा मिळते भाकर!" अशी संसारात तप्ततेत तापून दुसऱ्यांना आनंदी ठेवणारी माणसं आपल्याला दिसत नाहीत.एक हिंदी कवी म्हणतो,

"गुलमोहर तुम सिखाओगे क्या?

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

तपिश सहकर भी कैसे,

कोई इतना रंगीन हो सकता है?

चंद परेशानियोंसे बेरंग

हो जाती है दुनिया,

शायद तपिश क्या होती है

पता नही....

गुलमोहर तुम सिखाओगे क्या??"

रक्षारचित यांची ही कविता गुलमोहराला प्रश्न विचारणारी आहे.इतके चटके सहन करुन हे गुलमोहरा तू कसा एवढा बहरतो?

गुलमोहर हे प्रतिक आहे.अचेतनावर सचेतनाचा आरोप केला जातो,तेव्हा चेतनागुणोक्ती अलंकार होतो.मुक्ताई ज्ञानदेवांना हेच सांगते,"योगी पावन मनाचा साही अपराध जनाचा।" अनेक अवहेलना,अपमान गिळून आपण उभं राहिलं पाहिजे.म्हणून सोन्याला जितकी उष्णता दिली जाते,तितकी त्याची चमक वाढते.संतांचं असंच असतं,जेवढी अवहेलना ,विरोध,त्रास वाट्याला आला तेवढं त्यांचं व्यक्तित्व खुललं.अगदी गुलमोहरासारखं.

खान्देशातील संगीता वाणी नावाची कवयित्री आहे,त्यांची गुलमोहर कविता याच वाटेने जाणारी आहे.चिमणपाखरांचा मोठ्या कष्टातून उभा राहिलेला संसार,त्यात एकदिवस त्या कवितेतील नायिका त्या नायकाला प्रश्न करते,

"सहजच विचारले त्याला,

किती आवडते रे मी तुला?"

याप्रश्नावर कवयित्रीने रुपकाच्या माध्यमातून जे शब्दचित्र उभे केले आहे,ते खूप बोलके आहे.

"आणि त्याने गुलमोहराची काही फुलं

माझ्यावर उधळीत म्हटलं...

खूप आवडतेस....

आणि मग त्याच्या ओंजळीतला गुलमोहर...

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

माझ्या स्वप्नात बहरु लागला..."

वाणींच्या कवितेचे वैशिष्ट्यच हेच आहे की,या बाई जी मांडणी करतात,ती वाचकाला सहज उमजतच नाही.नवीन वाचक शब्दार्थाने ही प्रेम कविता समजून रसग्रहण करण्याचा बापडा प्रयत्न करील.पण ही केवळ प्रेमकविता नाही.जसं औषध कंपन्या गोळ्यांवर रंगीबेरंगी आवरण वापरतात व आत औषधाची मात्रा असते,तसं ही कवयित्री वरवर प्रेमकवितेचं आवरण लावते मात्र आत उच्च तत्वज्ञान भरते.म्हणजे मोठ्या चित्रकाराची चित्रं सामान्यांना रंगरेषा वाटतात पण त्यात काय भरलंय ते जाणकार चित्रकारालाच कळतं.तसं या कवयित्रीचं आहे.वरवर प्रेम कवितेव्दारे नायक फुलं उधळतो ही प्रेमभावना ठीक आहे,पण खरी मेख 'गुलमोहर' या रुपकात आहे.गुलमोहराची फुलाचं प्रतिक वापरते तेव्हा त्या नायकाच्या अपार कष्टानंतरही तो 'विसाव्याचे,प्रेमाचे क्षण' येतात तेव्हा रागाने व्यक्त होत नाही.ते प्रेम असतं गुलमोहरासारखं!रंगीत.लाल रंग हे जसं सौभाग्याचं,प्रेमाचं प्रतिक आहे तसं त्यागाचंही प्रतिक आहे.पिवळ्या रंगाचा सोनचाफा,किंवा गुलाब,कमळ ही प्रतिकं वापरली नाहीत.इथं संसाराच्या उन्हाचे कितीही चटके बसले तरी ,पानगळ झाली तरी तुला मात्र फुलांचा संभार अर्पण करीन.जो असेन प्रेमाचा,त्यागाचा आणि सौभाग्याचा !

त्यानंतर कवयित्रीने नायिकेच्या मुखात खूप उच्च दर्जाचं तत्वज्ञान प्रसवणारे शब्द घातलेत.त्यातून जीवनात किती तरी घटना आल्या,किती तरी सुखदुःखाचे क्षण आले पण त्याने त्यावेळी जो रंग लावला तो रंग ती विसरु शकत नाही.कबीरांची एक रचना आहे,ते म्हणतात की," या शरीरातला मी जो कोणी आहे?त्याची निर्मीती करणारा म्हणजे ही देहरुपी चादर निर्माण करणारा जो आहे त्याने अशी ही बनवली की,

"पाच तत्वांपासून बनवलीय.अष्ट भाव त्यात भरलेत.इतकी सुंदर बनवली की जेव्हा रंगाऱ्याकडे ती रंगवायला दिली,तेव्हा त्याने लाल रंग असा काही भरला की,अप्रतिमच!...झिनी रे झिनी!" पुढे कबीर जे म्हणतात ते महत्वाचं आहे,

"ऐसा रंग रंगा रंगरे ने

के लालो लाल कर दिनी

चदरीया झिनी रे झिनी!"

त्या नंदलालाने असा रंग भरला की मी त्याच्या रंगात रंगून गेले,ती इतकी रंगून गेले की,"मै भी हो गई लाल!" या अवस्थेला सायुज्यता मुक्ती म्हणतात.देव पहायला गेलेले तुकोबा स्वतःच देव होऊन जातात.आनंदाच्या डोहात,डोहही आनंदाचा,तरंगही आनंदाचे,अंगही आनंदाचेच !तसं या कवितेतील नायिकेचं झालंय.ती म्हणते जीवनात अगणित रंग आले अन् गेले.मात्र त्याने जो 'गुलमोहरी रंग'

माझ्यावर उधळला त्या रंगात एवढी रंगून गेले की अन्य रंग माझ्यावर जादू करुच शकले नाहीत.ते जे चार क्षण प्रेमाचे दिले,त्याने जीवन इतकं आतबाहेर रंगून गेलं की,सोयराबाई म्हणतात तसं,

"अवघा रंग एक झाला।रंगी रंगला श्रीरंग।।"

कवयित्री किती उच्च दर्जाचं तत्वज्ञान मांडते ते आत्ता लक्षात येईल.जेव्हा जीव ब्रम्ह ऐक्य होतं,तेव्हा त्या कृष्णाच्या रंगात रंगून गेलं की अगणित सुखदुःखाचे क्षण जरी आयुष्यात आले तरी काही फरक पडत नाही.तो भक्त आपल्या रंगात एवढा रंगून गेलेला असतो की,त्यावर इतर व्यवधानं प्रभाव पाडू शकत नाही.

कवयित्री संगीता वाणींच्या 'गुलमोहर' कवितेतील पुढील काव्यपंक्ती हाच भाव व्यक्त करतात,

"तुझ्या माझ्यातला तो गुलमोहरी रंग,

आजही तसाच आहे,

माझ्या जीवनात विखुरलेला,

हृदयात फुललेला....

स्वप्नात रंगलेला...

हो आजही अगदी तसाच आहे,

तुझ्या आठवणींसारखा !"

या कवितेला मूळ गंध आहे तो कृष्णप्रेमाचा! वृंदावनात गोपींनी जी रासक्रिडा केली,त्यात एक गोपी एक कृष्ण बनून रासक्रिडेचा मनमुराद आनंद त्यांनी लुटला.मात्र त्यातील एका गोपीला अहंकार निर्माण झाला,जगाचा मालक माझे पाय आपल्या तळहातावर घेतोय! तेवढ्या वेळेत तो क्षणात अंतरला.तुकोबांची एक गौळण म्हणते'तुका म्हणे पाहिले मागे।एवढ्या वेगे अंतरला।" गौळणीचं रुपक असलं तरी साधकाचं असंच होतं.ब्रम्हानुभूती झाल्यानंतर जो समाधीसुखाचा सोहळा तो भोगतो,त्यात अहंकार आला की सर्व साधना वाया जाते.अशी गौळण मग विरहाने व्याकुळ होते व सर्वत्र त्याचा शोध घेत फिरते.तिला अन्य कितीही सुखदायक गोष्टी दिल्या तरी निरसं सुख,निर्भेळ आनंद तिने भोगलेला आहे.त्यामुळे तिला अन्य कोणतेच सुख आनंददायक वाटंत नाही.कारण साक्षात आनंदाचा कंद तिने अनुभवलेला असतो.कवयित्री वाणींची नायिका या पंचलतिका नावाच्या गौळणीशी नाते सांगणारी विरहीणी आहे.तिला हवाय तो आनंदाचा कंद,ती गुलमोहरी फुलं,म्हणजे लाल रंगाची...."लाली मेरे लाल की जित देखूँ उत लाल! लाली देखन मै गई मै भी हो गई लाल।।" अशा रंगात रंगून गेलेली नायिका ,जीवनाच्या अनेक रंगात रंगूनही "रंग माझा वेगळा!" असं जेव्हा म्हणते,तेव्हा ती असते कृष्णप्रेमाने

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

वेडी झालेली मीरा,ती असते राधा,शेणींतही त्याचाच आवाज ऐकणारी जनी,तर ती असते वासनांच्या फिक्या रंगांना धुडकवणारी कान्होपात्रा!

वरवर पाहता,प्रेम कविता,किंवा विरह कविता वाटणारी संगीता वाणींची कविता इतकी मूलद्रव्ये शब्दांत ओतते की,अनेक प्रमेयं,परिकल्पना शून्य होऊन जातात.उरतो तो निर्भेळ आत्मानंद ,साऱ्या रंगात रंगून वेगळा असणारा 'श्रीरंग'!